महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १७२ वा दिनांक : ११/०४/२०२५ वार : शुक्रवार

## मंगेशकर कुटुंबीय म्हणजे लुटारूंची टोळी, विजय वडट्टीवार यांचा घनाघात



**मुंबई** : तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात काँग्रेस नेते विजय वडट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर कडाडून हल्ला चढवला आहे. मंगेशकर कुटुंब माणुसकीला लागलेला कलंक आहे. त्यांनी कधी कुणाला काही दान केले आहे का? खिलारे पाटलांनी त्यांना रुग्णालयासाठी जमीन दान दिली, पण त्यांनी त्यांनाही सोडले नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाचे तीव्र राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

तनिषा भिसे नामक गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चांगलेच वादात सापडले आहे. या रुग्णालयावर गंभीर स्थिती रुग्णालयात आलेल्या तनिषा यांच्या कुटुंबीयांकडे प्रसूतीसाठी तब्बल १० लाख रुपयांची अनामत रक्कम मागितल्याचा आरोप आहे. या प्रकरणी सरकारने नेमलेल्या चौकशी समितीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनावर हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर टीकेची झोड उठवली आहे.

विजय वडेट्टीवार बुधवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, तनिषा भिसे मृत्यू प्रकरण मी रोज वाचतो आहे. मंगेशकर कुटुंब म्हणजे लुटारुंची टोळी आहे. त्यांच्यापैकी कुणी कधी काही दान केले आहे का? चांगले गाणे म्हटले म्हणून सगळ्यांनी मिरवले... लतादीदी, आशादीदी, हे दीदी, ते दीदी... यांनी लोकांसाठी आणि देशासाठी काय केले? खिलारे पाटलांनी यांना जमीन दान केली, पण मंगेशकरांनी त्यांनाही सोडले नाही. त्यामुळे हे माणुसकीला कलंक आहेत असे मी म्हणतो. अशा पद्धतीने रुग्णालय चालवत असतील, तर मंगेशकर कुटुंब कलंक आहेत. विजय वडेट्टीवार यांच्या या विधानाचे तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

दुसरीकडे, भाजप आमदार अमित गोरखे यांनी मंगेशकर कुटुंबीयांना मृत तनिषा सुशांत भिसे यांच्या दोन्ही मुलींचे त्या १८ वर्षांच्या होईपर्यंत मातृत्व स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे काम पूर्वीपासून चांगले आहे. पुढेही ते असेच करत राहतील. परंतु, डॉक्टर सुश्रुत घैसास यांच्याकडून चूक झाली. त्यांनी स्वतः राजीनामा दिला आहे. आमच्यासाठी त्यांचा राजीनामा महत्त्वाचा नाही. डॉक्टर घैसास असतील किंवा इतर त्यांच्यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. पण मंगेशकर कुटुंबीयांनी सामाजिक भान ठेवून त्या दोन मुलींचे मातृत्व त्या १८ वर्षांच्या होईपर्यंत घेतले पाहिजे. कारण, अशा घटनांमध्ये संस्था जबाबदार असते, असे गोरखे यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आमदार अमित गोरखे यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी त्यांच्यावर आपल्या भूमिकेवरून यु टर्न घेतल्याचा आरोप केला आहे. भाजपचे आमदार अमित गोरखे यांचे आपल्या भूमिकेवरून यु टर्न घेण्याचे कारण काय? गोरखे यांच्यावर कोणाचा दबाव आहे का? गोरखे यांना कुणी, काही आदेश दिले आहेत का? असे विविध प्रश्न राज्याच्या जनतेच्या मनात निर्माण होत आहेत. पडद्यामागे काही घडत असेल की नाही याची कल्पना नाही. पण एका आईने जीव गमावला आहे याचा संवेदनशीलपणा ठेवायला हवा, असे त्यांनी म्हटले आहे.

## अपनी हार को जीतमें बदल देंगे हम - एकनाथ शिंदे



**सांगोला** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हात बढाकर आसमाँ छू लेंगे हम. अपनी हार को जीत में बदल देंगे हम, असे म्हणत शहाजी बापू पाटील यांना मी तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही, असा शब्द दिला आहे. आमदार, नामदार असुदे किंवा नसू दे एकनाथ शिंदे ज्यांच्या पाठीशी उभा आहे, त्यांना चिंता करण्याचे काही कारण नाही, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या सभेत बोलताना एकनाथ शिंदे यांनी शहाजी बापू पाटील यांचे पुनर्वसन करण्याचे संकेत दिले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, मंत्री संजय शिरसाट, प्रकाश आबीटकर, शंभूराज देसाई, आमदार समाधान आवताडे, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची उपस्थिती होती. आता एकनाथ शिंदे हे शहाजी बापूंना कोणती संधी देतात ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अनेकदा काम करूनही यश मिळत नाही, त्यामुळे निराश व्हायचे नसते. एखादी मॅच हरली म्हणून विराट कोहिलीची बॅट थंड पडत नाही. पुढच्या मॅचमध्ये दुप्पट वेगाने गोलंदाजांवर तुटून पडते आणि चॅम्पियन ट्रॉफी घरात येते, त्यामुळे शहाजीबापू चिंता करू नका. शहाजी बापूंसाठी मी एकच शब्द उच्चारतो, टायगर अभी जिंदा है. शहाजी बापूंना मी वाऱ्यावर सोडणार नाही. 'हात बढाकर आसमाँ छू लेंगे हम. अपनी हार को जीत में बदल देंगे हम', असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहाजी बापू पाटील यांना आणि त्यांच्या समर्थकांना शब्द दिला.

कार्यकर्ता हा काम करणारा असतो. त्याला हार जीतची पर्वा नसते. बापू तुमच्यावरचे लोकांचे प्रेम बघून एकदम ओके वाटतंय. आभार यात्रेच्या निमित्ताने सध्या राज्यात फिरतोय, त्यामुळे शहाजीबापूंना मतदान करणाऱ्यांचे मी आभार मानतो. सांगोल्यात शहाजी बापू पाटील यांना यश आले नसले, तरी तेच जनतेच्या मनातील नेते आहेत, हे मला माहिती आहे. आमदार, नामदार असूदे किंवा नसू दे एकनाथ शिंदे ज्यांच्या पाठीशी उभा आहे, त्यांना चिंता करण्याचे काही कारण नाही, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## सेन्सॉर बोर्डाकडून जात व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न:आमदार जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याच्या जीवनावर आधारित फुले नावाच्या हिंदी सिनेमावरुन सध्या वाद सुरु आहे. पुण्यातील ब्राह्मण महासंघाने या सिनेच्या ट्रेलरमधील काही दृश्यांवर आक्षेप घेतले आहेत. त्यामुळे सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटातील अनेक सीन व संवाद कापण्याचे निर्देश दिलेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सेन्सॉर बोर्डावर टीकेची झोड उठवली आहे. जातीवाद्यांनी भरलेल्या सेन्सॉर बोर्डाने आपल्या सवयीप्रमाणे इथली जातव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला, असे ते या प्रकरणी म्हणालेत. सत्य पराभूत होऊ शकत नाही!!! भारतीय इतिहासात चातुर्वर्ण्य, कर्मकांड आणि ब्राह्मणवाद यांचे सत्य नाकारणे हा मूर्खपणा आहे. ज्यांना चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा दंश सहन करावा लागला, त्यात छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचाही समावेश आहे. या कर्मकांडामुळेच महाराजांना "तुमचा राज्याभिषेक होऊ शकत नाही" असा विक्षिप्त आदेश देणारे कोण होते हे पाहणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. संभाजी महाराजांच्या हत्येचा कट कोणी रचला? यावर चर्चा झालीच पाहिजे. बरे झाले, काही लोकांनी महात्मा फुलेंवरील चित्रपटाला विरोध केला. यातून काही सत्य समाजापुढे येईल आणि झोपलेले बहुजन जागे तरी होतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वर्गाबाहेर बसवणारे कोण होते, त्यांना वर्गात का बसू दिले नाही? कोणत्याही एका समाजाचे बुद्धिमत्ता आणि ज्ञानावर नियंत्रण असू शकत नाही.

ज्ञान आणि बुद्धिमत्तेवर विशिष्ट समाजाची मक्तेदारी असेल आणि हजारो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा मोडीत काढणारा कोणी असेल, तर त्यात महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने येते. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी जातिव्यवस्था, भेदभाव आणि स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक देण्याच्या विरोधात केलेले कार्य अजरामर आहे. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीसाठी नव्हते तर संपूर्ण मानवतेसाठी होते. ब्राह्मणवादामुळे पतीच्या मृत्यूनंतर महिलेचे केस कापले गेले. ही अत्यंत विकृत प्रथा समाजातील एका वर्गात रूढ झाली होती. महात्मा फुले यांनीच याला विरोध केला होता. त्यांचा लढा त्या जातीतील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी होता. स्त्रियांना शिक्षित करायचेच नाही, हा आदेश त्याच कर्मकांडाचा एक भाग होता. त्याला पहिला धक्का फुले दाम्पत्याने दिला. स्त्री ही कोणत्याही जातीची नसते, ती आई, बहीण, पत्नी असते. याच विचाराने त्यांनी शिक्षणाची दारे खुली केली. आज ज्या स्त्रियांकडे पुरोगामी म्हणून पाहिले जाते, त्यांचे दैवत म्हणजे महात्मा फुले आणि सावित्री माई आहेत. फुले दाम्पत्याने कर्मकांड आणि ब्राह्मणवादाच्या विरोधात पुकारलेला संघर्ष नाकारण्याचा अर्थ आम्ही भयभीत आहोत असे म्हणणे आहे. सावित्रीबाईंनी समाजसुधारणा आणि महिलांना शिक्षित करण्याच्या कार्यात प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला हे तुम्ही कसे नाकारू शकता? त्याच्या ऐतिहासिक नोंदी कागदपत्रांसह उपलब्ध आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


## शिक्षणात कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा



काल टी.व्ही.ला बातमी आली
शाळेतील पटसंख्या कमी झाली
सरकारला निमित्तच भेटले
शाळा बंद करायची पाळी आली

नाहीतरी सरकारची भूमिका
शिक्षणाविषयी उदासीनच हाय
पटसंख्येचे निमित्त मात्र
बहुजनांचे खच्चीकरण करायचं हाय

दिवस पक्षासारखे भुर्रकन उडून गेले
शिक्षणाची प्रगती दिसत नाही
शिक्षणसेवक,कॉन्ट्रॅक्ट,नवीन धोरण पद्धती आली
सुशिक्षित,बेरोजगारांची मुद्दामहून दैना केली

शिकणा-यांनाही शिक्षणाची ओढ नाही
विद्यार्थी संख्या वरचेवर कमी होत आहे
त्याला सरकारच जबाबदार
शिकलेल्यांना सरकारकडून जीवनाची हमी नाही

शाळा बिळा,ज्ञानाचे
मुलांना पहिल्यासारखे आकर्षण राहिले नाही
नोकरीच कुठे मिळत नाही
शिक्षण घेऊन फायदा तरी काय?

शाळा असो किंवा आरोग्य
जिकडे तिकडे धिंडवडे निघत आहेत
हे सारं कळत असुनही
सरकार झोपेचे सोंग घेऊन गप्प आहे

खरे तर शाळेने सर्वसामान्यांचे जीवन
आजपर्यंत सर्वगुणसंपन्न, विकसनशील बनवले
आज मात्र सरकारच्या कात्रीने, नियमाने
शिक्षणाचे सारे वजवाटोळे झाले

तरीही आज कुणाचाच
आवाज निघत नाही
आवाजही आज काल
देशद्रोही आणि नक्षलवादी झाला आहे

शिक्षणावर,भ्रष्टाचारावर अन् पेपर फुटीवर
सरकारचा अजिबात वचक नाही
आमदारांना शिक्षकाचा पगार दिसतो
स्वत:चा भ्रष्टाचार मात्र झाकला जातो

फुले, शाहू, आंबेडकरांनी
बहुजनांच्या शिक्षणासाठी जीवाचे रान केले
आत्ताची शैक्षणिक धोरणं मात्र
बहुजनांनाच गिळंकृत करत आहेत

शाळकरी मुलांच्या दप्तरात ड्रग्स अन् काही
पुढारी अन् मंदिरातील पुजारीही ड्रग्सच्या विळख्यात
नेत्यांनो तुम्हीच सांगा आता
कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा ?


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे**
**मो.9423397484**


## उबाठा शिवसेना जळकोट तालुकाध्यक्षपदी विकास सोमुसे-पाटील यांची नियुक्ती



**अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अतनूर येथील रहिवासी विकास गोविंदराव सोमुसे-पाटील यांची जिल्ह्याचे संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, जिल्हाप्रमुख बालाजीभाऊ रेड्डी यांच्या शिफारशीनुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.जळकोट तालुका अध्यक्षपदावर दुसऱ्यांदा अतनूर ता.जळकोट येथील बाळासाहेब ठाकरे हिंदुत्ववादी कट्टर समर्थकाचे निवड झाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक व अभिनंदन करून स्वागत व सत्कार करण्यात येत आहे.त्यांची नियुक्ती जिल्ह्यांचे संपर्कप्रमुख, मराठवाडा विभाग प्रमुख, महाराष्ट्राचे प्रमुख, जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, जिल्हाप्रमुख, जिल्हा उपप्रमुख तसेच इतर बाळासाहेब ठाकरे कट्टर समर्थक नेतृत्वाच्या शिफारशीने करण्यात आली आहे.

## नदी होता आली पाहिजे



प्रत्येकालाच नदी होता येणार नाही
पण -
नदीचा प्रवाह होता आला पाहिजे
जगणं नेहमी माणसांचं
वाहत्या पाण्यासारखं पाहिजे.
स्वच्छ, नितळ, निर्मळ नी
निर्मोही..
पण सोपं नसतंच मुळी नदी होणं
ती किती किती देते आपणास
आयुष्याला पुरून उरणारं
आपण फक्त घेतच आलोय
तिचा फायदा
तिचा मात्र एकही गुण घेता येत नाही, आपणास
ती जगणं आणि जीवनही सोपं करते अगदी सहजपणे
आपण मात्र उगाच त्रागा करीत जगत असतो पावलो पावली
निखळ माणूस म्हणून माणूसकीची गाणी गात
जीवनाचा चौखूर उधळता आला पाहिजे..
उगाच खोटे खोटे जगण्यात काय मजा
नदी आपल्या अस्तित्वाला पुरून उरणारी असते
आणि
शेवटी ही आपणास तिच्या कुशित ती सामावून घेते...
ती देतच रहाते
घेत मात्र काहीच नाही
म्हणून,
आपणास
निखळ आनंदासाठी आणि
निर्भेळ जगण्यासाठी
नदी होता आली पाहिजे....


**- डॉ. शिवाजी हुसे**
**मो. 94040 00398**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


# उद्योजक तथा नेशन बिल्डर ; महात्मा जोतीराव फुले - डॉ. प्रकाश खेत्री



**छ. संभाजीनगर,** (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) कंपन्याचे सामाजिक उत्तरदायित्व फंड या संकल्पनेचे व विचारांचे जनक, स्त्रियांचे आणि अस्पृश्यांचे कैवारी, समता आणि मानवतेचे पाईक, सामाजिक क्रांतीचे जनक, आघाडीचे उद्योजक, शेअर मार्केटचे अभ्यासक, कृषी व अर्थतज्ञ, क्रांतीबा महात्मा जोतीराव फुले यांची आज १९८ वी जयंती. यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन...!)

महात्मा जोतीराव फुले हे केवळ समाजसुधारक वा शिक्षणक्रांतीचे जनकच नव्हे, तर ते दूरदृष्टीचे उद्योजक, शेती व आर्थिक क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेचा पाया रचत 'शेतीला व्यवसायाची' जोड दिली. त्यांनी सन-१८६३ साली 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' (Pune Commercial & Contracting Company) या कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून अनेक ऐतिहासिक कामे केली तसेच देशात अनेक पायाभूत सुविधा उभारल्या, ज्याचा फायदा आज महाराष्ट्र व देशाला होत आहे. या कंपनीचा उद्देश केवळ व्यवसाय करून नफा मिळवणे हा नव्हता तर या सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक ते पाठबळ मिळावे हा मुख्य उद्देश होता. महात्मा फुले यांनी उद्योग, अर्थकारण, समाजकार्य यांचा योग्य समन्वय साधला. त्यांनी उभारलेल्या या प्रकल्पांची आणि चळवळींची गरज आजच्या भारतीय समाजाला आहे. आधुनिक भारताच्या औद्योगिक विकासासाठी महात्मा फुले यांचे विचार, कार्य दिशादर्शक व प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास वाटतो.

महात्मा फुले यांनी आपल्या 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' द्वारे अनेक मोठे व सार्वजनिक प्रकल्प पूर्णत्वास नेले. त्यांनी पुण्याहून साताऱ्याला जाणारा 'कात्रजचा बोगदा', पुणे शहराकडूंन नगरकडे किंवा संभाजीनगर मार्गावरील 'बंड गार्डनचा पुल' बांधला आहे. बंडगार्डनला आणि येरवड्याला जोडणारा मुळा-मुठेवरचा ब्रिटीशकाळातील पूल सन १८६७ साली बांधला. या पुलाचे आयुष्य १०० वर्षांचे होते. प्रत्यक्षात तो १४० वर्षे वापरात आला. आजही तो भक्कमअवस्थेत उभा आहे. फक्त सुरक्षिततेसाठी सध्या तो रहदारीला बंद करण्यात आला आहे. आज पुणे महानगर पालिकेच्या हेरिटेज विभागाने तेथे एक भव्य 'आर्ट प्लाझा' उभारला आहे. सन १८६७ साली 'फिट झेराल्ड ब्रिज', तसेच 'खडकवासला धरणाचा डावा कालवा'. पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीने बांधला. अशी मोठी कामे महात्मा फुले यांनी या कंपनीच्या माध्यमातून केली. ही कंपनी केवळ कॉन्ट्रॅक्टच घेत होती असे नव्हे, तर ह्या कंपनीच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली. १८६५ मध्ये तुकाराम तात्या पडवळ यांचे 'जातीभेद विवेकसार' हे पुस्तक प्रकाशित केले, तसेच बौद्ध विचारवंत 'अश्वघोष' यांच्या 'वज्रसूची' हा ग्रंथ प्रकाशित करून लोकांपर्यंत पोहोचवले. पुण्यात त्यांनी एक पुस्तक विक्री केंद्रही उभारले होते, या केंद्राने समाजप्रबोधनाची मोठी भूमिका बजावली. आपल्या देशातील महिलांना सोन्याची खूप आवड आहे असे म्हणतात. हे दागिने तयार करण्यासाठी जे सोन्याचे 'मोल्ड्स' [साचे] लागतात, ह्या मोल्ड्सची संपूर्ण मुंबई प्रांताची होलसेल एजन्सी महात्माजींच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीकडे' होती. त्यावेळी मुंबई प्रांतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व सिंध हे भाग होते. या कंपनीच्या माध्यमातून आणखीन एक काम महात्मा जोतिबा फुले करत, ते म्हणजे पुण्याच्या हडपसर परिसरातून फळे, भाजीपाला रेल्वेने ते मुंबई येथील 'भाईखळा भाजी मार्केटला' पाठवले जात असत. त्यामुळे पुढे भाईखळा मार्केटला 'महात्मा जोतिबा फुले' यांचे नाव देण्यात आले. या कंपनी तर्फे करण्यात आलेले आणखीन एक काम म्हणजे, वेगवेगळ्या शिक्षण संस्था स्थापन करने, त्या संस्था चालवणे, त्याच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबवणे, वाचनालय स्थापन करने ही कामे आदी संस्था व कंपनी करत असे.

त्यांचे एक सहकारी तसेच 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मधील भागीदार पोलास राजा लिंगू यांनी "कॅम्प एज्युकेशन सोसायटीची" स्थापना जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने सन १८८५ साली मुंबई येथे सुरू केली. ही संस्था आज देखील कार्यरत आहे. महात्मा फुले यांचे आणखीन एक सहकारी व्यंकु कालेवार जे त्यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मध्ये भागीदार होते. त्यांनी सन १८८९ ते १८९६ या काळात मुंबई येथील महानगरपालिकेची ईमारत बांधली होती. रामय्या व्यंकय्या आय्यावरू यांनी देशातले सर्वात जुने 'भंडारदरा धरण' हे 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'च्या माध्यमातून बांधले होते. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांचा 'लक्ष्मी विलास' नावाचा राजवाडा सुद्धा त्यांच्या 'पुना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'ने बांधला होता. महात्मा फुले सात वर्ष पुणे आयुक्त पदावर होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण कामे केली. त्यापैकी त्यांनी बंद नळाद्वारे पाणी पुणे शहरात आणून ते शुध्द करून नळाने देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले होते. त्या काळी अशुद्ध पाण्याची समस्या खूप मोठी होती. त्यांनी खडकवासला धरणातून शेताकडे पाणी नेण्यासाठी कॅनॉल देखील बांधले. तसेच पुणे शहरात प्रत्येक पेठेमध्ये किमान 'एक दवाखाना' व किमान 'एक शाळा' असली पाहिजे, असा महत्वाचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पांद्वारे जोतीरावांनी आधुनिक स्थापत्यशास्त्र आणि औद्योगिक व्यवस्थापनाची पायाभरणी केली. यामुळे देशातील औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली आणि भारताच्या आर्थिक विकासाला बळकटी मिळाली.

आजच्या काळातील बहुतेक उद्योगपती फक्त आर्थिक नफा मिळवण्यासाठी उद्योग करतात, मात्र महात्मा फुले यांचे उद्योग व व्यवसाय हे समाजउभारणी, समाज सुधारणेसाठी होते. जोतीराव फुले यांनी आपल्या कंपनीद्वारे मिळवलेल्या नफ्यातील बहुतांश रक्कम सामाजिक सुधारणा आणि शिक्षणासाठी खर्च केली. स्त्री-शिक्षण, शेतकरी उध्दार, जातिनिर्मूलन,सामाजिक चळवळींसाठी आपली सर्व 'स्वकष्टार्जित संपत्ती' खर्च केली. आज 'बिल्डर' हा शब्द प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिकांसाठी वापरला जातो. मात्र, महात्मा फुले 'नेशन बिल्डर' 'राष्ट्रनिर्माते' होते. त्यांनी केवळ इमारती, पूल, धरणे बांधली नाहीत, तर शेती, शिक्षण, समता, ममता, मानवता, बंधुता, सामाजिक न्यायाच्या विचारांची पायाभरणी करून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ उभारली. महात्मा फुले यांनी 'शेअर मार्केट', भारतीय कृषी अर्थशास्त्रावरही लेखन केले आहे. भारताला औद्योगिक व्यवस्थापनाचा एक आदर्श घालून दिला आहे.

'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी' यांची त्याकाळात वार्षिक उलाढाल त्याकाळात टाटा यांच्यापेक्षा जास्त होती. सन- १८६९ साली टाटा यांच्या कंपनीची वार्षिक उलाढाल २००००/- रुपये होती, तर महात्मा फुले यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीची' वार्षिक उलाढाल ही २१०००/- रुपये होती. म्हणजेच तेव्हा ते टाटापेक्षा श्रीमंत होते. महात्मा फुले यांनी मिळविलेला नफा सामाजिक कामांसाठी मुक्तहस्ते खर्चून टाकला. ही स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून जोतीरावांनी तहहयात समाजकार्य केलं. आजच्या काळातील CSR (Corporate Social Responsibility) चे मूळ जनक महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारातच दडलेले आहे. आपण २०१३ (Companies Act, 2013) च्या कलम १३५ अंतर्गत सरासरी नफ्याच्या २% खर्च करणे कंपन्यांना बंधनकारक केली आहे. CSR खर्च न केल्यास आर्थिक दंड आणि कायदेशीर दंडाची तरतूद केली आहे. असा कोणताही कायदा नसताना महात्मा फुलेंनी आपल्या नफ्यातील १०० % वाटा सामाजिक उत्तरदायित्वासाठी खर्च केला आणि समाजक्रांतीचे जनक ठरले. आजपर्यंत भारताच्या इतिहासात आपल्या कंपनीच्या नफ्यातील एवढा मोठा वाटा समाजकार्यासाठी लावणारे महात्मा फुले हे एकमेव समाज क्रांतीकारक आणि उद्योजक आहेत. हा इतिहास कोणीही खोडू शकत नाही किंवा जगातील कोणताही उद्योजक व व्यावसायिक हा विक्रम मोडू शकेल किंवा गाठू शकेल असे मला वाटत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपला गुरू मानले, महात्मा गांधींनी त्यांना "देशातील पहिले खरे महात्मा" असे गौरवले, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना "समाज क्रांतिकारक" म्हणून संबोधले. तीन भिन्न वैचारिक विचारवंतांनी महात्मा फुल्यांचा यथोचित सन्मान आणि गौरव केला, ही बाब फुले यांच्या 'महात्मा' उपाधीची व द्रष्टेपणाची साक्ष देते. त्यांचा वारसा केवळ सामाजिक सुधारक म्हणून नव्हे, तर एक द्रष्टे उद्योजक, कृषी व अर्थतज्ज्ञ म्हणूनही ओळखला गेला पाहिजे. आजच्या उद्योजकांनी, समाजसुधारकांनी महात्मा फुले यांच्या विचार, कार्यातून प्रेरणा घेत, उद्योग - व्यवसायातून मिळालेला नफा समाजहित, कार्य,समाजउद्धारासाठी वापरता येतो, याचे उत्तम उदाहरण घालून द्यावे. महात्मा फुले यांचे वैचारिक अनुयायी व्हावे... ! हीच महात्मा फुले यांना खरी आदरांजली ठरेल...! असे मला वाटते.


**डॉ. प्रकाश खेत्री**

कन्नड, जि. छ. संभाजीनगर,

7843092244

prakashkhetri044@gmail.com





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


## पडेगावात ह.भ.प. गंगाराम महाराजांचे कीर्तन उत्साहात आई वडिलांच्या सेवेने सुसंस्कृत पिढी निर्माण होईल




**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** पडेगाव येथिल प्रतिष्ठित दिवंगत नागरिक कै. बन्सीलाल वाणी यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील पैठण येथिल सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प गंगाराम महाराज राऊत यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी त्यांनी उपस्थितीताना मार्गदर्शन केले की,आजच्या काळात जो आई वडिलांची सेवा करील तोच भविष्यात आपल्या पुढील पिढीत संस्कार शिल समाज निर्माण करण्यासाठी तत्पर असेल यासाठी आई वडिलांची सेवा महत्वाची आहे. संत सेवा ही कृती मधून घडायला हवीय केवळ आई तू खूप चांगली असं म्हणून चालणार नाही. यासाठी प्रयत्नांची परकंष्ठा करावी लागते.असे सांगितले. यावेळी पडेगाव पंचक्रोशीतील प्रतिष्ठित, नागरिक, महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

## भीम माझा सरताज



भीम भीम भीम,भीम माझा सरताज
भीम जन्मला म्हणून आलं समतेचं राज!!
धृ!!
भीम रत्न अनमोल
भीम पाणी चवदार
मुक्त काळया रामा केलं
भीम ढाल अन् तलवार
भिमा तूझ्या जन्मामुळे आम्हा मिळाला आधार
सूर्य उगला म्हणून दूर झालाय अंधार!!१!!
तूच दाविली रे भिमा
लोकशाहीची ही वाट
केले सारे दूर काटे
वाटेवरचे घनदाट
भीम भीम भीम, भीम स्वराज्य मावळा
लेकिंच्या सुखासाठी, संसदेत तो भिडला!!२!!
भीम भीम भीम
साऱ्या वादळांचा बाप
नाव भिमाचं रे घेता
लागे दृष्टांना रे धाप
भीम फुले न् कबीर, भीम बुद्ध अन् धम्म
मुकनायकाच्या माथी, नित्य गाथा तुकाराम!!३!!
भीम भीम भीम
भीम बळीचा कैवारी
भीम बांधता धरण
पिक सोन्याचं शिवारी
भीम कष्टाचे हे हात,भीम निळाईचा साज
भीम अथांग सागर,भीम माझा सरताज!!४!!

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

**मो.9403384889**

## महिला व पुरुषाचे छिन्नविछिन्न अवस्थेत आढळला मृतदेह





**दिग्रस (महेश मुंढे) :** दिग्रस शहरापासून जवळच असलेल्या दत्तापूर जवळील ग्राम कोलुरा शिवारात सोमवार, दि.७ एप्रिल रोजी रात्री ३० ते ३५ वयोगटातील एका अनोळखी महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. सदर अनोळखी स्त्री जातीचे प्रेत, जिचे वय ३० ते ३५ वर्षे, उंची अंदाजे पाच फूट, गोल चेहरा, अंगात निळसर आकाशी रंगाची साडी, निळा ब्लाऊज परिधान केलेले आहे. दिग्रस पोलिसांनी घटनास्थळ गाठून तपास सुरू केला असताना आज मंगळवार, दि. 8 एप्रिल रोजी सकाळी घटनास्थळापासून १०० मीटर अंतरावर एका अज्ञात पुरुष जातीच्या व्यक्तीचा सांगाडा आढळून आल्याने विविध चर्चेला उधाण आले आहे.

या दोघांची दुसऱ्याच ठिकाणी हत्या करून मृतदेह परिसरात फेकून दिल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. सदर घटना घातपात की अन्य काही याबाबत तर्क-वितर्क लावले जात आहे. याबाबत दिग्रस पोलिसांनी विविध पथके तयार करून तपास सुरू केला आहे. सोमवारी रात्री अज्ञात महिलेचा मृतदेह असल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अज्ञात महिलेची ओळख पटविण्याचे आवाहन केले होते. मंगळवारी सकाळी पुन्हा एका पुरुष जातीचा सांगाडा सापडल्यानंतर पोलिसांनी तपासाला गती दिली आहे. वृत्त लिहेपर्यंत दोन्ही मृतदेहांची ओळख पटलेली नव्हती. दिग्रस पोलीस तपासात गुंतले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


# भूमीजन कैवल्याची कविता 'पेरण'-किशोर जऱ्हाड




कवी किशोर जऱ्हाड यांचा दुसरा काव्यसंग्रह 'पेरण'.भूमिजनाचा कैवल्य कैवार सांगणारी धान्याचं दान करणारी मायभूईची कविता.ठळक होऊ पाहते आहे."संघर्ष हा मायबापा चे विद्यापीठ.कै.उध्दवराव किसनराव पाटील जऱ्हाड (वडील) व्यथांची ओंजळ भरुन असतांनाही माझ्या हातावर अक्षर फुले ठेवणारी सरस्वतीबाई उध्दवराव पा.जऱ्हाड (आई) यांच्या चरणी ही काव्य फुले". ही सविनय अर्पण पत्रिका मन व्याकूळ करून जाते. माय माती गावं शिवाराचं अथांग मायाळूपण घेऊन सृजनशील भाव या कवितेचा ठाव आहे.मराठी काव्य विश्वात अनेक अर्थांनी ग्रामीण कविता आली आहे.या पुर्वी 'गंध रानमातीचा'हा दमदार आशय संपन्न कविता देणारे कवी किशोर जऱ्हाड एक सामाजिक भान देतं आपली कविता समृद्धपणे गावं शिवाराची गहिवरणारी पेरण कविता देतात जसे,"पत्ता विचारयलाही नाही माणूस इतके बंदिस्त झालो आम्ही फ्लॅट संस्कृतीत..."माणसा माणसातील माणुसकीच्या नात्याची तुटत चालेलीनात्याची नाळ, जिव्हाळा आपुलकी स्नेह हा ओलावा नष्ट होत चालला.नुस्ताचं बडेजाव दिखाऊपणात माणूस कोरडा होतं चालला.आजच्या गावशिवारचे माथेठणक एवढी भंयकर झाली आहे की,शेतीमातीची बारभाई खेती झाली आहे.गावखेड्याची उलंगवाडी झाली आहे.त्यात बाप हा एक श्रेष्ठ श्रध्देचा भाव माय ही जन्माची शिदोरी.या कवितेत बापाचे ऋण असे,"बाप प्रेमाची सावली,बाप पंढरीची माऊली बाप जीवाचा पोशिंदा,बाप रूपाया बंदा "विचार,आचार, आणि संस्कार जिजाऊ माँ साहेबांनी जसे छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्यासाठी घडविले.तसेकवीने आईचा संघर्ष मांडला आहे."सोसलेला सासूरवास,ननदेचा उपवास,सटवीचा टाक भाळी,माय होती साधी भोळी.फाटलेली साडी चोळी."अशी अनंत करूणेची भावना कवी व्यक्त करतो.संस्काराची पेरण बाळंपणीच्याकाळात होतं असते पुढे मायबाप जन्माची शिदोरी असते.आयुष्याला पुरून उरणारी असते.माती माणसाचा ऋणानुबंध मांडताना ही मातीच्या घामाचा मृदगंध सांगणारी मुक्त व्यक्त आविष्कार चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक रचना आहे.जसे,"हंबरली वासरे,..पान्हावल्या गाई.सांजवेळी विसावली जूई अन् जाई.दीर्घ राती दूर एका, फकिराची भैरवी, चंद्र सांगे आभाळासकिरणाची थोरवी",ही प्रांजळ नितळ निर्लेप काव्य धारा घेऊन येणारी कविता.मनमुक्त व्यक्त होते.या कवितेला लक्षवेधी स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्र पोटे राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे.ही अभिनंदनीयबाब तेवढीचं आत्मिक जिव्हाळयाची व प्रगल्भ जाणिव वाढवणारी आहे.जसे,"प्रिय तू माझ्या डोळ्यात एक नवा साज दे...पाहताना रुप तुझे डोळ्यात साठवून घ्यावेअनंत काळासाठी..."कवी किशोर जऱ्हाड हे ता. बदनापूरचे..यांचा गाव शिवार माथा उज्ज्वल व्हावा,या भूईच जगणं म्हणजे आत्मिक पेरण करतं गेलं पाहिजे या ठळक भूमिकेतून कवी किशोर जऱ्हाड आपल्या कलासक्त भावनेतून व्यक्त झाले आहेत.कवीला रंगसंगतीची बांधूनी अवगत आहे तशीच शब्दगंधाची बाधा आहे.म्हणून गावं शिवार कवेत घेऊन सृजनशील भावनेचा काव्य पेरा करत ही पेरण या कवितेने मुग्धपणे दिला आहे.शब्दाची आराधना करताना जी जगण्याची धारणा होती ती शब्दांकित करताना प्रतिभेलाचिंतनचा पट असवा लागतो.हुसळन घुसळून झाले की,ताकाचे दही अन् दह्याचे लोणी आणि लोण्याचे तुप.. तेंव्हाच कवितेला ही येते रूप.. मुठीतला दाना जेंव्हा तिफणीच्या चाड्यातून अन् फनाच्या सरीतून मातीच्या उदरी पडायचा तेंव्हा पेरणी तासी लागयची.त्या धनालाएक मुर्तीमंत शेतकरी बापाचा हात लागायचा अशी ही कविता मुखपृष्ठ सहीत कवीनेच ताशी लावली आहे.कारण ही कुणब्यांची पेरण आहे.जसे,"रानात पेरण ह्या जीवाची पेरण,ओलं गोठली मना आतली,करा हृदयात स्नेहाची पेरण.चाड्यातून हाती दाना करी पेरण"ही निस्सीम शेती मातीच्या भक्तीची कविता आहे.या कवितेने, दुष्काळ, पाऊस, गाव खेड्यातील ग्रामीण वास्तव, नात्याची अगतिकता,बैलबारदाना, आयुष्याचे रंगढंग, पिकं पाण्याची नासाडी, आनंद, दु:ख प्रेम, कवितेचा मनोज्ञ भावविभोर आविष्कार पेरणी ची ठेवून आहे.कवीने शेतकरी कष्टकरी मजुरांची व्यथा वेदनांवर फुंकर घातली आहे.एकुणचं शब्दगंध भाव व्याकुळ करणारे आहेत.महाराष्ट्रातील ख्यातनाम कवी तथा 'सर्वधरा'त्रैमासिकाचे साक्षेपी संपादक प्रा डॉ सुखदेव ढाणके यांनी समर्पक चिंतन आशय संपन्न प्रस्तावना लिहिली आहे हे कवीचे सार्थकीपण आहे.

**Δकाव्यसंग्रह:-पेरण किशोर जऱ्हाड**

**Δपुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

**Δ संवाद:-९९७५१३७३३७**

**Δ शब्दजा प्रकाशन,**

**Δराजेश बहाळे अमरावती ६**

**Δमुखपृष्ठ :-किशोर जऱ्हाड रेखाटने उध्दव शहाणे,**

**Δमूल्य १६० रूपये**

# उच्च शिक्षण हा विकासाचा पासपोर्ट- डॉ. सुधीर गव्हाणे



**नांदेड :** उच्च शिक्षण हा विकासाचा पासपोर्ट आहे. त्याचा विस्तार झालेला असला तरी गुणवत्ता वाढलेली नाही. त्यासाठी आपल्या सर्वांना जागरूक राहून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरून प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.सुधीर गव्हाणे यांनी केले. ज्ञानदीप शिक्षण व संशोधन प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने पीपल्स कॉलेजच्या नरहर कुरुंदकर सभागृहात प्रा. डॉ. डी. एन. मोरे लिखित 'उच्च शिक्षण धोरण : आव्हाने आणि दिशा' या ग्रंथावरआयोजित परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी माजी खासदार आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर , नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. श्यामल पत्की, प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ. सूर्यकांत जोगदंड, नारायण चौधरी, प्राचार्य डॉ. आर.एम. जाधव, प्राचार्य डॉ. श्रीमती कुसुम मोरे, सौ. सुनीता मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.गव्हाणे म्हणाले की, सरकार शिक्षण क्षेत्रातून काढता पाय घेण्याची भूमिका घेत आहे. शिक्षण खाजगी क्षेत्राच्या ताब्यात देण्याची भूमिका घेत आहे. पण खासगी व सरकारी या दोन्ही शाळा सुरू राहायला हव्यात. त्यांच्यात निकोप स्पर्धा असावी. त्यातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायला हवे. यातून देशाचा आणि राज्याचा विकास होईल.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 हे अत्यंत प्रभावी आहे, पण त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. त्यात जीडीपीच्या 6 टक्के आर्थिक तरतूद करावी लागते, ती केलेली दिसून येत नाही. पुरेसा शिक्षक वर्ग नेमावा लागत असतो, शाळांमध्ये उत्तम प्रकारच्या सोयी-सुविधा असणे गरजेचे आहे. ग्रंथालये असावी लागतात. पण दुर्दैवाने अशी व्यवस्था आपल्याकडील हजारो शाळांमध्ये असल्याचे दिसत नाही. नवीन शैक्षणिक धोरण तळागाळापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.आरोग्य व शिक्षण या दोन विषयांवर जास्त लक्ष देण्याची गरज आहे. उत्तम दर्जाच्या सुविधा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणीबाबत योग्य ते प्रशिक्षण न दिले गेल्याने प्राध्यापक वर्ग संभ्रमात आहे. सरकारने या प्रकरणी योग्य पाठबळ दिले तर हे उत्तम प्रकारे राबवले जाऊ शकते. समाजातील सर्व घटकांनी देखील आपली जबाबदारी ओळखून हे काम हाती घेतले पाहिजे. या पार्श्वभूमीवर डॉ.डी.एन.मोरे यांनी आपल्या इंग्रजी विषयाच्या पलीकडे जाऊन उच्च शिक्षणात विशेष रस घेवून लिहिलेले पुस्तक म्हणजे मराठीतला सर्वात उत्तम ग्रंथ आहे. त्यात विचारांची स्पष्टता, अभ्यासाची सखोलता आणि गुणवत्तेची मौलिकता आहे. डॉ.मोरे हे अभ्यासूपणे सातत्याने या विषयावर लिहित आले असून 150 व्याख्याने देखील दिलेली आहेत. एक ग्रंथ म्हणून 12 विषयांची केलेलो मांडणी आणि चिकित्सा करण्याची वृत्ती अभिनंदनीय असल्याचेही डॉ.गव्हाणे यांनी यावेळी सांगितले.खरेतर शिक्षणाच्या माध्यमातून पुढच्या समाजाची बांधणी आणि विकास होत असतो. यामुळे शिक्षणातील गुंतवणूक ही अधिक फलदायी असते. हे जागतिक पातळीवरही सिद्ध झाले आहे. मात्र आपल्या देशात ते गांभीर्याने होत नसल्याने या सर्व गोष्टींचा बळी विद्यार्थी ठरत आहे. यामुळे विद्यार्थी, राज्य व पर्यायाने देशाचे नुकसान होत आहे. सरकारने प्राध्यापकांची आणि शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची गरज आहे. यासह ग्रामीण भागातील शाळा, महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. ज्या शाळांचे उत्पन्नाचे स्त्रोत सक्षम नाहीत, त्यांना मदत करण्याची जबाबदारी सरकारची आहे. पण कोणतेही सरकार असो त्यांची वक्रदृष्टी ही नेहमी शिक्षणाकडेच असल्याचे दिसून येते. शिक्षण हे त्यांच्या दृष्टीने प्राधान्य क्रमाकांचा विषय नाही अशी खंतही डॉ. गव्हाणे यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. चासकर यांनी नवीन शैक्षणिक धोरण सर्वांनी प्रभावीपणे राबवावे. त्यासाठी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करील असे सांगितले. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. मोरे यांनी प्रास्ताविकातून आपला पुस्तक लेखन प्रवास सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप काळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.संगीता अवचार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दत्ता सावंत, डॉ. तुकाराम हापगुंडे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. बाजीराव वडवळे, प्रा. संदीप गायकवाड, डॉ. मुकुंद कवडे, डॉ. दत्ता यादव यांनी परिश्रम घेतले.यावेळी माजी आ.गंगाधर पटने, जगदीश कदम,प्रा.बालाजी कोम्पलवार, दीपनाथ पत्की, उपप्राचार्य डॉ अशोक सिद्धेवाड, नवनिहालसिंग जागीरदार, प्रा.डॉ.दिलीप चव्हाण, डॉ. मा.मा. जाधव, प्राचार्य डॉ कणसे, डॉ. विना पाटील, प्राचार्य अशोक गवते, प्राचार्य डॉ. कामळजकर, प्राचार्य करुणा देशमुख आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५

# क्रांतीसूर्य : महात्मा जोतिराव फुले



जोतीराव फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण; त्याच गावी जोतीराव यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला, जोतीराव यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत, त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले.जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला.जोतीराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असे. शाळेतील शिस्तप्रिय, हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता.त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतीरावकडून काही कबीरपंथी फकीर रोज महात्मा कबीरांचा 'बीजमती' हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे जोतीरावांच्या मनावर कबीराच्या विचारांची शिकवण चांगलीच बिंबली.विद्येविना मती गेली ।मतीविना नीती गेली ।नीतीविना गती गेली ।गतीविना वित्त गेले ।वित्ताविना शूद्र खचले।इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. आणि इ.स.१८४८ साली त्यांनी पुण्यामध्ये बुधवार पेठेतील 'भिडे' यांच्या वाड्यात मुलींची पहिली मराठी शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी-सावित्रीबाईंवर सोपविली. आणि यानंतर जोतीबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहिल्यानगर येथील मिस फरार यांच्याकडून घेतली त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या त्याच बरोबर अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केल्या. महात्मा फुले यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण -सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे करीत, तसेच ते शाळांतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधने आणि उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनाही उत्तेजन देत असत. मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये 'थॉमस पेन' यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे ठाम मत होते.महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा जो बोध केला त्यातील ही काही वचने आपण वाचली की लक्षात येते , जोतीरावांचा आवाका किती मोठ्ठा होता . त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. त्यासाठी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात काय आमूलाग्र बदल घडवून आणायला हवा यासाठी मानवी स्वभाव आणि मानसिकता यात काय बदल केले पाहिजेत, याबाबतही ज्योतीरावांनी विपुल लेखन केले आहे. 'अखंड' या काव्यप्रकारात त्यांनी 'मानवाचा धर्म', आत्मपरीक्षण, नीती, समाधान, सहिष्णुता, सदसदविवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता, इत्यादी गोष्टींवरही भाष्य केले आहे.जोतिरावांनी वेगवेगळ्या अखंडातून जे विचार मांडले, मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केला, त्यामुळे व त्यांच्या समतावादी दृष्टिकोनामुळे समाजाला एक नवी दिशा मिळाली. पुढे हा वारसा त्यांच्या अनुयायांनी चालू ठेवला.कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची (अस्तिक्यवादी) विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी 'शेतकऱ्यांचा आसूड' इत्यादी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या ' सार्वजनिक सत्यधर्म' संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा 'सत्यशोधक' समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून 'दीनबंधू' हे साप्ताहिक चालविले जात असे. तुकारामाच्या अभंगांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. अभंगांच्या धर्तीवर त्यांनी अनेक 'अखंड' लिहिले . त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते. आपला 'गुलामगिरी' ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. 'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८९१ मध्ये प्रकाशित झाला. 'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक' हा फुले यांचा शेवटचा ग्रंथ. तत्त्वज्ञ म्हणून त्यांचे थोरपण या ग्रंथातून लक्षात येते. 'सत्यमेव जयते' हे बीजसूत्र घेऊन साकारलेला हा ग्रंथ सत्यावर आधारलेल्या नव्या सर्वसमावेशक धर्माच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करणारा ग्रंथ आहे.महात्मा फुले यांचं समग्र लेखन आणि साहित्य हे समाजाला दिशादर्शक आणि प्रेरणादायी असंच आहे लोकशाही राज्यव्यवस्थेत वर्तमानपत्र ही लोकशाहीचे आधारस्तंभ मानले जातात तत्कालीन स्थितीमध्ये हे वर्तमानपत्र लिहिणारे वर्तमानपत्रांचा अधिकार हा उच्चवर्णीय समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडणारा होता त्यामुळे या काळात महात्मा फुले यांनी तत्कालीन पत्रकारितेवर टीका केली त्याचप्रमाणे पत्रकारिता तशी असावी याविषयीचा मापदंड देखील त्यांनी घालून दिला. एक मूलगामी विचारवंत म्हणून महात्मा फुले यांनी मोठी ग्रंथसंपदा निर्माण केली. त्याचबरोबर बहुजन समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्या काळात वृत्तपत्र लिखाण देखील केले. क्रांतिकारी व सुधारणावादी लेखक या नात्याने महात्मा फुले यांनी समग्र वाङ्मय लिहिले आहे त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड', 'गुलामगिरी' या ग्रंथांतून सामाजिक स्थिती व त्यातून बाहेर पडण्यासाठीचा मार्ग याचे समग्र चित्रण महात्मा फुले यांनी केले आहे. त्यांच्या लिखाणात तत्कालीन निद्रिस्त उपेक्षित समाजाला जागृत करून, त्या समाजामध्ये शोषणाविरुद्ध बंड करण्याची ताकद निर्माण करण्याची क्षमता होती. यामुळेच महात्मा फुले यांचे लिखाण हे निर्विवाद क्रांतिकारी आहे.दि.११ मे इ.स.१८८८ रोजी मुंबईतील कोळीवाडा येथे जनतेने रावबहादुर विठ्ठलराव वंडेकर यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना 'महात्मा' ही पदवी प्रदान केली त्यानंतर ते 'महात्मा' नावाने ओळखले जाऊ लागले. अशा या बहुआयामी विचारांनी व कार्याने अवघ्या मानव जातीला प्रकाशित करणारा क्रांतीसुर्य आपल्या कार्याचा प्रकाश कायम तेवत ठेऊन दि.28नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे अस्ताला गेला तो कायमचा . त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन...!

**संकलन - प्रा. योगेश रावते**
**मो. 75880 97273**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002